—: प्रेसनोट :—                                                  दि. २२/०२/२०२२

**यातील फिर्यादी यांच्या मुलास भांडणादरम्यान झालेल्या दुखापतीसंदर्भातील तक्रार नोंद न करता, त्यांच्या मुलाचा ताब्यात घेतलेला मोबाईल परत देण्याकरीता यातील आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे रु. ५,०००/— लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती रु. ३,५००/— लाचेची रक्कम स्विकारुन लाचेच्या रक्कमेसह पळुन गेल्याने गुन्हा नोद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ०९/२०२२ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ सह भा.दं.वि. कलम २०१ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | प्रविणकुमार सुरेश पवार, वय ३० वर्षे, धंदा—नोकरी (पोलीस उप निरीक्षक), नेमणुक साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ५,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ३,५००/— |
| थोडक्यात माहिती | दिनांक २१/०२/२०२२ रोजी यातील फिर्यादी यांचे रहाते घराजवळ झालेल्या भांडणामध्ये फिर्यादी यांचे लहान मुलाचे डोक्यास दुखापत झाली. त्यामुळे फिर्यादी हे त्यांच्या मुलासह तक्रार देण्याकरीता साकीनाका पोलीस ठाणे येथे गेले असता, यातील आलोसे याने त्यांना रात्रभर पोलीस ठाण्यात बसवून ठेवुन, त्यांची कोणतीही तक्रार नोंदवून घेतली नाही. तसेच फिर्यादी यांच्या मुलाचा ताब्यात घेतलेला मोबाईल परत देण्याकरीता रु. १०,०००/— च्या लाचेची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून आलोसे यांचे विरुध्द लेखी तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०२/२०२२ रोजी पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी केली असता, आलोसे याने पंचासमक्ष रु. ५०००/— लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती सापळा कारवाई दरम्यान रु. ३,५००/— लाचेची रक्कम स्विकारुन, तात्काळ घटनास्थळावरुन लाचेच्या रक्कमेची विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने लाचेच्या रक्कमेसह पळुन गेला म्हणुन सदरचा गुन्हा नोंद. |

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net. टोलफ्री. क. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScann